**Q.P. Code : 08009**

**वेळ: २½ तास** **एकूण गुण :७५**

सूचना: १) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
२) **उजवीकडील अंक गुण** दर्शवितात.

१. पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील अनुकृतीविषयक सिद्धान्ताची विस्तृत चर्चा करा. १५

**किंवा**

पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील विविध मीमांसकांनी केलेल्या काव्यव्याख्या स्पष्ट करा.

२. रूपक व प्रतिमा यांचे काव्यभाषेतील कार्य स्पष्ट करा. १५

**किंवा**

नियमोल्लंघन व अपरिचितीकरण या संकल्पनांचे विवेचन करा.

३. पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील कल्पनाशक्तीविषयीच्या सिद्धान्तांचे विवेचन करा. १५

**किंवा**

'आत्माविष्कार' आणि 'जीवनभाष्य' ही दोन साहित्यप्रयोजने स्पष्ट करा.

४. साहित्याच्या आस्वादासंदर्भात 'कॅथार्सिस' ही संकल्पना स्पष्ट करा. १५

**किंवा**

'साहित्याद्वारे मानवी प्रेरणांचे व्यवस्थापन केले जाते' हा विचार प्रेरणासंतुलनाच्या सिद्धान्ताच्या आधारे विशद करा.

५. (अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही **पाच**) १०

१. 'मानवी जीवन ही सत्त्वाची अनुकृती असते' हा विचार सर्वप्रथम कोणी मांडला?
२. 'द बेस्ट वर्डस् इन बेस्ट ऑर्डर' ('उत्तम शब्दांची उत्तम रचना') असे कवितेचे लक्षण कोणी सांगितले आहे?
३. प्रतिमेची व्याख्या लिहा.
४. साहित्यभाषेतील अपरिचितीकरणाची कल्पना कोणी मांडली आहे?
५. कोलरिजने सांगितलेले कल्पनाशक्तीचे दोन प्रकार कोणते?
६. जीवनभाष्य हे साहित्यप्रयोजन कोणी सांगितले आहे?
७. ॲरिस्टॉटलने कॅथार्सिसची संकल्पना कोणत्या साहित्यप्रकारासंदर्भात मांडली आहे?
८. रिचर्डस्‌ने साहित्याच्या आस्वादासंदर्भात कोणता सिद्धान्त मांडला आहे?

(आ) योग्य पर्याय निवडा. ०५

(१) अनुकृतीविषयक चर्चा ॲरिस्टॉटलने कोणत्या ग्रंथात केली आहे?
(क) रिपब्लीक (ख) सेव्हन टाईप्स ऑफ ॲम्बिग्युटी
(ग) पोएटिक्स (घ) द राईज ऑफ नॉव्हेल

(२) कवितेची व्याख्या करताना कोणत्या मीमांसकाने कवितेतील सांगितिक तत्त्वावर भर दिला आहे?
(क) एडगर ॲलन पो (ख) कोलरिन
(ग) वर्डस्वर्थ (घ) अर्नोल्ड

**[Turn Over]**

munotes.in

(३) कोलरिजने कल्पनाशक्तीशिवाय आणखी एक मानसिक शक्ती मानली आहे; ती कोणती?

(क) व्युत्पत्ती (ख) प्रेरणा

(ग) चमत्कृतीशक्ती (घ) नवता

(४) 'चांपेयाची पिवळी पवळण, घाली फुगडण राधा गवळण' या ओळींतील 'पवळण' व 'फुगडण' हे शब्द कशाचे उदाहरण आहेत?

(क) नियमोल्लंघन (ख) भावनासंक्रमण

(ग) कॅथार्सिस (घ) विशुद्धीकरण

(५) पुढीलपैकी कोणती संज्ञा 'कॅथार्सिस' च्या संदर्भात वापरली जात नाही?

(क) विशुद्धीकरण (ख) विरेचन

(ग) निर्दोषीकरण (घ) प्रेरणासंतुलन

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-

munotes.in